# Current Global Reviewer


Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

[redacted] Impact Factor - 7.139 [redacted]

12 April 2021 Special Issue- 40 Vol. II


# Thoughts of Dr. B.R. Ambedkar





**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal Dr. Kishan Pawar**

Impact Factor – 7.139 ISSN – 2348-7143

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

**12 April 2021 Special Issue- 40 Vol. II**

# Thoughts of Dr. B.R. Ambedkar

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

**Guest Editor**
**Principal Dr. Kishan Pawar**

**Shaurya Publication, Latur**

37. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे हिंदू कोड बील — 112
प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण

38. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे हिंदू कोड बिल — 116
दिपाली वैजनाथ आडे

39. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार" — 119
संध्या उध्दवराव करमनकर, डॉ. हरी नारायण जमाले

40. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता" — 123
शिंगे विकास मलकारी

41. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पत्रकारिता" — 127
विकास गवई

42. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीविषयक विचार" — 130
प्रा. दिपाली वाहुळे

43. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक न्यायाची संकल्पना — 133
प्रा. गौतम गायकवाड

44. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारीता — 136
डॉ. प्रा.पांडूरंग एकनाथ शिवशरण

45. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री-विषयक विचार — 138
डॉ. राजेश्री अप्पाराव जाधव

46. डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि 'हिंदू कोडबील' स्त्री हक्कांचा जाहिरनामा — 140
प्रा. गौतम गायकवाड

47. "महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचा तुलनात्मक अभ्यास" — 142
डॉ. सतिश खरात

48. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री विषयक विचार — 145
श्रमेश पाटील

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 40, Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
April 2021 | SJIF | Impact Factor : 7.139

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे हिंदू कोड बील

**प्रा.डॉ.शिवाजी गोविंदराव दिवाण**
सहयोगी प्राध्यापक,राज्यशास्त्र विभाग, महिला महाविद्यालय,गेवराई, ता.गेवराई जि.बीड (महाराष्ट्र)

---

**प्रस्तावना :**

स्वतंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळाच्या निर्मितीत स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा दि.3 ऑगस्ट 1947 रोजी मंत्रीमंडळात समावेश करण्यात आला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री-स्वातंत्र्यविषयक विचार मूलभूत परिवर्तनवादी होते. 'स्त्रीला जागृत करुन, तिला अधिक संरक्षण देऊन, पुरुषांच्या जाचातून मुक्त करण्यासाठी तिला समानता, आर्थिक, राजकीय, सामाजिक स्वतंत्र्य एका विशेष कायद्याने द्यावे असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. म्हणून त्यांनी हिंदू कोड बिलाची निर्मिती केली. बाबासाहेबांनी मांडलेले 'हिंदू कोड बील' म्हणजे स्त्री गुलामीला लावलेला सुरुंग होता. अंधार संपविणारा प्रकाशझोत होता. भारतीय स्त्री हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्री स्वातंत्र्याच्या प्रकाशात येणार होती. स्त्री ही समाजाची संस्कृती, क्रांतिशाळा आहे. स्त्री प्रकाशात असणे म्हणजे समग्र समाज प्रकाशात असणे होय.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना संपूर्ण समाजव्यवस्थेत परिवर्तन हवे होते. हिंदू कोड बिलामुळे भारतातील स्त्री वर्गाला न्याय मिळणार हे निर्विवाद सत्य होते. या कायद्याच्या माध्यमातून भारतीय स्त्री परंपरांच्या विषारी आणि विषयमताप्रिय शृंखलातून मुक्त होणार अशी त्यांची धारणा होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बील कोणत्याही धर्माच्या विरोधात मांडत नव्हते. तर पृथ्वीच्या पाठीवर पुरुषांइतक्याच स्त्रियाही आहेत, त्यांना समान हक्क मिळावयासच हवा या मानवतेच्या दृष्टीकोणातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर हिंदू कोड बिलाकडे पाहत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना 'धर्मनिरपेक्ष आणि इहवादी' भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून सर्व जग मुजरा करते.

**प्रारंभीचे हिंदू कोड बील :**

14 एप्रिल 1937 रोजी 'हिंदू स्त्रियांच्या मालमत्तेच्या हक्काचा कायदा' पास केला गेला, हे बील गोपाळराव देशमुख यांनी केंद्रीय कार्यमंडळात मांडले याच बिलाला याच कायद्याला 'देशमुख कायदा' म्हटले जाते. देशमुख कायदा अगदीच छोटा, फक्त पाच कलमे असलेला होता. या कायद्यानुसार स्वतंत्र मिळकतीच्या बाबीतीत मुलांबरोबर विधवा बायकोलाही हिस्सा दिला गेला होता. परंतु देशमुख कायदा हा प्रांतिक सरकाच्या हद्दीतील शेतीच्या इस्टेटीस लागू नाही. शेतीशिवाय इतर मिळकतीच्या बाबतीत तो लागू आहे. असा निकाल फेडरल कोर्टाने दिला. हिंदुस्थानातील लोकांची मालमत्ता शेकडा 80% शेतीच्या स्वरुपात असल्यामुळे देशमुख कायदा 80% निरुपयोगीच ठरला.

देशमुख कायद्याचा सर्वांगीण विचार करण्यासाठी आणि निर्णय मत देण्यासाठी त्यात आवश्यत त्या सुधारणा करण्यासाठी मध्यवर्ती सरकारने न्यायाधिश सर बेनेगल नरसिंहराव यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नियुक्त केली. सर बी.एन.राव यांच्या सिलेक्ट कमिटीने अनुकूल-प्रतिकूल अशा सगळ्या मतमतांतराचा सारासार विचार करुन प्रस्तुत केलेल्या अहवालावर व मुद्यांवर हिंदू कोड बिलाचा मसूदा तयार करुन हे बील दि.11 एप्रिल 1947 रोजी जोगेंद्रनाथ मंडल यांनी लोकांपुढे मांडले होते. परंतु हिंदू कोड बीलावरील सोपस्कार पूर्ण झाले नव्हते. दि.3 ऑगस्ट 1947 रोजीच्या भावी स्वातंत्र भारताच्या पहिल्या मंत्रिमंडळाच्या निर्मितीनंतर 15 ऑगस्ट 1947 ला भारताच्या स्वातंत्र्याच्या घोषणेनंतर कायदेमंत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा एक सिलेक्ट कमिटी नेमली.

राव यांचे हिंदू कोड बील फेर तपासणीसाठी घ्यावे असे डॉ.आंबेडकरांनी ठरविले आणि पंडित, विद्वान समाजसुधारक अशा एकूण 20 लोकांची दि.9 एप्रिल 1947 रोजी डॉ.आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली सिलेक्टं कमिटी नेमली. या सिलेक्ट कमिटीत डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांचा सुध्दा अंतर्भाव केला होता. राव कमेटीचे बील केवळ विवाह व वारसा यासंबंधीचे मर्यादित होते. दत्तक विधान, उत्तराधिकार, पोटगी, घटस्फोट इत्यादी, गोष्टींचाही विचार करणे अत्यंत आवश्यक होते. डॉ.आंबेडकरांना हवे ते मुद्दे त्यात घालून सर्वसमावेशक अशा हिंदू कोड बीलाची पध्दतशीर पुर्नबांधणी त्यांनी केली. पुर्नबांधणीतून निर्माण झालेले हिंदू कोड बिल कायदे मंडळापुढे दि.12 ऑगस्ट 1948 रोजी सादर केले आणि हिंदू कोड बील म्हणजे डॉ.आंबेडकर आणि डॉ.आंबेडकर म्हणजे हिंदू कोड बील असे समीकरण पुढील काळात रुढ झाले. राव यांच्या हिंदू कोड बीलाला जेवढा विरोध झाला त्यापेक्षा शंभर पटीने जास्त आणि प्रखर विरोध डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सादर केलेल्या हिंदू कोड बिलास झाला.

हे बील 21 ऑगस्ट रोजी निघालेल्या भारत सरकारच्या गॅझेटच्या 489 ते 550 पृष्ठांवर छापून प्रसिध्द केले. 'हिंदू कोड बील' यावर वर्तमानपत्रांतून जेव्हा जेव्हा संदर्भ देण्यात येत तेव्हा तेव्हा त्याला 'आंबेडकर स्मृति' असे संबोधण्यात येत असे. डॉ.आंबेडकरांच्या तनामनात हिंदू कोड बिल संचारले होते. कारण विषमतेच्या निखाऱ्यातून स्त्रियांना समतेच्या आणि सन्मानाच्या सावलीत डॉ.आंबेडकरांना आणावयाचे होते.

**हिंदू कोड बिलाचा उद्देश :**

हिंदू कोड बील म्हणजे सामाजिक असमानता, भेदभाव, विषमता पसरविणाऱ्या आणि स्त्रियांना बंदिस्त ठेवणाऱ्या चालीरितींवर प्रहार होता. हिंदू कोड बील हे सर्व जाती संप्रदाय वीर-शैव, प्रार्थना समाज, आर्य समाज, ब्राम्हण, लिंगायत, बौध्द, जैन आणि शीख या सर्वांनाच लागू करण्यात येणार होते. तसेच विवाह विच्छेद, दत्तक घेणे, संपत्तीमध्ये मुलीला मुलासोबत त्याच्या बरोबरीचा हिस्सा आणि उत्तराधिकारी नेमण्याचा अधिकार अशा गोष्टींचा समावेश डॉ.आंबेडकरांनी हिंदू कोड बिलामध्ये केला होता.

**अ) विवाह :**

1) **शास्त्रोक्त पध्दत -** स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळानंतरही शास्त्रोक्त पध्दतीच्याच विवाहाला मान्यता होती.

2) **सिव्हिल विवाह -** बिलाच्या व्यवस्थे अंतर्गत रजिस्टर्ड विवाहालाच रजिस्टर्ड केले जाऊ शकते. व रजिस्टर्ड विवाहामध्ये संपिडत्वाच्या समानतेमुळे कोणतीही अडचण येत नाही.

**आ) विवाह विच्छेद :**

पूर्वी कायद्याने बहुपत्नीत्वाला मंजूरी असे मात्र नवीन कायद्याने एकपत्नीत्वाची अट टाकली.

**इ) घटस्फोट :**

हिंदू कोड बिलाअंतर्गत सात कारणांव्दारे घटस्फोट दिला जाऊ शकत होता. 1) परित्याग, 2) धर्मपरिवर्तन, 3) रखेली ठेवणे किंवा रखेली (णे, 4) संक्रामत गुप्तरोग, 5) असाध्य उन्माद, 6) भयंकर आणि असाध्य कुष्ठरोग, 7) क्रूरतापूर्ण व्यवहार

**ई) संपत्तीच्या जन्मसिध्द अधिकाराची समाप्ती :**

दत्तक घेणे किंवा कुणाला दत्तक जाणे

**उ) संपत्ती :**

माहेरी तसेच सासरी संपत्तीत वाटा असणे.

**ऊ) मिताक्षर आणि दायभाग :**

मिताक्षर पध्दतीचे एकत्र कुटूंब संस्था आणि वारसा हक्क याबद्दलचे कायदे आहेत व दायभाग या पध्दतीखाली मुलाला हा हक्क मिळायचा मात्र स्त्रियांना तो नव्हता.

**डॉ.आंबेडकरांच्या हिंदू कोड बिलास विरोध :**

1) 'बाबासाहेब व्दारा हिंदू कोड बिल हाय लगाना था कि समस्त रुढीवादी हिंदू जगत बोखला उठा। यह कहा गया कि हिन्दू कोड बिल हिन्दू परम्पराओ और रुढियों का सर्वनाश कर देगा, इससे हिंन्दू समाज कलह का शिकार होकर नतभ्रष्ट हो जायेगा'

2) डॉ.आंबेडकर यांनी हिंदू कोड बिल किंवा नवी भीमस्मृति रचली आहे आणि त्यातील सर्व गोष्टींना धर्मशास्त्राचा आधार आहे असे ते सांगत आहेत. "पण दूध अगर गंगोदक कितीही पवित्र असले तरी ते नाल्यातून अगर गटारातून आले तर पवित्र मानता येत नाही, त्याचप्रमाणे धर्मशास्त्र कितीही प्रमाण असले तरी ते डॉ.आंबेडकरांसारख्या महाराकडून आले असल्यामुळे प्रमाण मानता येत नाही." हे उद्गार संकेश्वर पिठाचे श्रीमंत जगद्गुरु शंकराचार्य मोरेशास्त्री यांनी रुक्मिणी पटांगणावर भरलेल्या सनातन्यांच्या सभेत काढले. एवढयावरच ते थांबले नाहीत तर हिंदू कोड बिलाबरोधात दौरा काढला आणि डॉ.आंबेडकरांच्या विरोधात जनमत उभे केले.

3) **डॉ.राजेंद्रप्रसाद (राष्ट्रपती) यांचा विरोध :**

'वुइमेन्स इंडियन असोसिएशन' या संस्थेतर्फे घटना समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ.राजेंद्र प्रसादांचा दि.26 एप्रिल 1948 ला मानपत्र देवून सत्कार झाला. या स्त्री संस्थेने हिंदू कोड बिलाचे रुपांतर कायद्यात व्हावे अशी ज्यांच्याकडून अपेक्षा केली. परंतु डॉ.राजेंद्रप्रसादांनी त्यांचा अपेक्षाभंग करीत भाषण दिले- "मी जुन्या मताचा आहे, पूर्वापार चालत आलेल्या गोष्टींवर माझी श्रध्दा आहे. माझी मते तुम्हाला प्रतिगामी वाटतील पण महात्माजींच्या शिकवणुकीप्रमाणे वागणारा मी आहे, हिंदू कोड बीलाला पाठिंबा देण्याचे अभिवचन मी देऊ शकत नाही."

4) **गांधी टोप्यांची होळी आणि स्वामी सत्यानंदाचे उपोषण :**

लोकसभेत 1949 च्या डिसेंबरला हिंदू कोड बिल चर्चेसाठी मांडले. या प्रसंगी सभागृहाबाहेर हिंदू कोड बीलाच्या विरोधात विरोधकांनी गांधी टोप्यांची होळी केली व स्वामी सत्यानंद सरस्वतींनी लोकसभेच्या बाहेर दहा दिवस उपोषण करुन या बिलाला विरोध केला. पुढे या बिलास स्थगिती आणूनच त्यांनी उपोषण सोडले.

5) **स्त्रियांचा बिलाला विरोध :**

स्त्रियांचे सर्वच स्वातंत्र्य नष्ट करु पाहणाऱ्या खलनायकांवर बाबा ाहेब सर्व सामर्थ्यानिशी तुटून पडत मात्र त्यावेळी स्त्रियांनीही बाबासाहेबांना साथ दिली नाही. काही स्त्रियांनी दिल्लीत असताना काही प्रमुख स्त्रियांचे शिष्टमंडळ त्यांना भेटावयास गेले व हे बिल चांगले नाही असे सांगितले. त्यावर बाबासाहबांनी ते 'बील वाचले का'? असे विचारले तर त्यांनी वाचले नाही असे सांगितले.

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Special Issue 40, Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
April 2021 | SJIF | Impact Factor : 7.139

यावर बाबासाहेबांनी त्यांना न वाचताच का विरोध करता? अशी विचारणा केली असता त्यातील प्रमुख स्त्री उत्तरली ती म्हणाली, "माझ्या नवऱ्याने मला सांगितले की, तू बिलाला विरोध कर, नाही तर मी दुसरी बायको करीन म्हणून सवत पत्करण्यापेक्षा बिलाला विरोध करणे मला भाग आहे." ही स्त्रियांची मानसिक दुर्बलता आहे. त्यात त्यांच्या ह्या दुर्बलतेमुळेच या बिलाचा घात झाला. स्त्रियांच्या पायात ताकद असती तर बिल कधीच बारगळे नसते. पार्लमेंटमध्ये निवडून आलेल्या स्त्रियांनी देखील या बिलाबाबत काहीही जागरुकता दाखविली नाही.

6) **लोकसभेतील सभासद आणि इतर मान्यवर विरोधात**

सभापती मावळकर, पं.मुकुटबिहारीलाल भार्गव, गृहमंत्री वल्लभभाई पटेल, न्यायाधीश सरदार हुकूमसिंग, एस.एन.सहाय, ठाकूरदास भार्गव, बी.दास यांनी हिंदू कोड बिलावर खूप टीका केली.

7) **पं.नेहरुंना डॉ.आंबेडकरांचे पत्र -**

डॉ.बाबासाहेबांनी दि.10 ऑगस्ट 1951 रोजी पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरुंना पत्र लिहिले - "प्रिय पंडित नेहरु, माझ्या प्रकृतीबद्दल मला नि माझ्या डॉक्टरांना चिंता वाटत आहे. तथापि, मी स्वत:ला डॉक्टारांच्या स्वाधीन करण्यापूर्वी हिंदू कोड बील हातावेगळे करण्याची मला उत्कंठा लागून राहिली आहे. तरी मी आपणास विनंती करतो की, त्या विधेयकाला आपण अग्रक्रम देवून 16 ऑगस्ट रोजीच ते लोकसभेपुढे विचारासाठी ठेवावे म्हणजे 1 सप्टेंबरपर्यंत त्यावरील चर्चा पूर्ण होईल. या विधेयकाला मी किती महत्व देतो आणि ते लोकसभेत संमत व्हावे यासाठी वाटेल तेवढे शारीरिक कष्ट सोसावयास मी कसा तयार आहे हे पंतप्रधानांना माहितच आहे". आपला, बी.आर.आंबेडकर

पंतप्रधान नेहरुंनी बाबासाहेबांना त्याच दिवशी कळविले की, "तुम्ही जरा धीराने घ्यावे, हिंदू कोड बिलास आत आणि बाहेर असा दोन्ही बाजूंनी विरोध असल्यामुळे ते लोकसभेच्या विचारासाठी सप्टेंबरच्या आरंभी घ्यावे असे मंत्रिमंडळाने ठरविले आहे."

**हिंदू कोड बिल स्थगितीचा आदेश :**

पंडित नेहरु जरी हिंदू कोड बिलाचे समर्थक होते तरी आरोग्यमंत्री श्रीमती अमृत कौर यांच्यापासून ते राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद आणि इतर कॉंग्रेसी मंडळी पंडित नेहरुंचे मतपरिवर्तन करण्यात समर्थ ठरले. याच विरोधी वातावरणात निवडणुकीच्या नाजूक परिस्थितीमुळे शेवटी पं.नेहरुंनी दि.26 सप्टेंबर 1951 ला 'हिंदू कोड बिल' स्थगित केले. असे जाहिर केले. अशाप्रकारे हिंदू कोड बिलाच्या विरोधकांचा विजय झाला.

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा मंत्रिपदाचा राजीनामा :**

पंडित नेहरुच्या अखेरच्या भूमिकेवर डॉ.आंबेडकर नाराज झाले. पंडित नेहरुनी मला साथ दिली नाही असे ते बोलले. कारण त्यांचे प्रकाशाचे स्वप्न पूर्णत्वास येऊ शकले नाही. स्वत:चा मुलगा वारला असता तर जेवढे दु:ख झाले असते. त्यापेक्षा अधिक दु:ख हिंदू कोड बिलाच्या इतिश्रीमुळे झाले असे बाबासाहेब सांगतात.

"मी माझा राजीनामा देण्यास अखेर जी गोष्ट कारणीभूत झाली ती सांगतो, ती म्हणजे हिंदू कोड बिलाबद्दल सरकारने केलेला चालढकलपणा व बेपर्वाई, केवळ हिंदू कोड बिलासाठी मी मंत्रिमंडळात राहिलो. काहींना माझ हिंदू कोड बील मांडणे चुकीचे वाटेल पण माझ ी दृष्टी वेगळी होती. हिंदू कोड बिल ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण घटना होती. पार्लमेंटपुढे यापुर्वी आलेल्या किंवा यानंतर येणाऱ्या कोणत्याच कायद्याची बरोबरी या हिंदू कोड बिलाबरोबर करता येणार नाही असे त्याचे महत्त्व आहे. यावरुन मी हिंदू कोड बिलाला एवढे महत्व का देतो याची आपणास कल्पना येईल. म्हणूनच तीव्र मतभेद असताना सुध्दा मी मंत्रिमंडळात राहिलो. जर यात मी चूक केली असेल तर ती केवळ काही भरीव व मौलिक काम करण्याकरीताच होय."

अखेर बाबासाहेबांनी 27 सप्टेंबर 1951 ला आपला राजीनामा दिला. बाबासाहेबांचे राजीनामा प्रकरण गाजले. लोकसभेचे वातावरणही तापले होते. डॉ.बाबासाहेब संतप्त होऊन, दु:खी होऊन वैतागून लोकसभेतून निघून गेले. या संदर्भात खादीधारी आणि कॉंग्रेसच्या राजकर्त्यावर प्रहार करणारा अग्रलेखही 'द टाईम्स ऑफ इंडियाने' लिहिला.

हिंदू कोड बिलाच्या नामंजूरीनंतर चार वर्षानी परिस्थितीची आवश्यकता लक्षात घेऊन डॉ.आंबेडकरांच्या कोड बिलात काही बदल करुन काही भागांचे कायद्यात रुपांतर करण्यात आले. या काही कायद्यांची ही कागदावरील तडजोड होती. भारतीय मानसिकता त्याचा स्वीकार करण्यास काना-डोळा करते. स्त्री मुक्तीच्या अधोगतीला भारतीय स्त्री पुरुषांची मानसिकता कारणीभूत आहे हे नाकारता येत नाही.

डॉ.आंबेडकरांचे हिंदू कोड बील म्हणजे या मानसिकतेवर वज्राघात होता, या मानसिकतेवर प्रहार होता. खरे म्हणजे डॉ.आंबेडकरांच्या स्त्री स्वातंत्र्यविषयक विचाराची भारताला गरज आहे.

डॉ.आंबेडकरांनी स्त्रियांच्या उन्नतीसाठी सारे आयुष्य खर्ची केले. हे कोड बील म्हणजे स्त्रियांच्या मानवी हक्कांची स्त्रियांच्या सर्वांगीण विकासाची अमृतकुपीच आहे.

**CURRENT GLOBAL REVIEWER**
Special Issue 40, Vol. 2 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
April 2021 | SJIF | Impact Factor : 7.139

डॉ.आंबेडकरांनी भारतीय संविधानात वारसा हक्क, संपत्तीचा हक्क,मतदानाचा हक्क,जीर्णमत वाद्यांचा विरोध पत्करुन दिला. डॉ.आंबेडकरांनी कष्टकरी, बिडी मजूर, कामकरी स्त्रियांचे वेतन या बाबतीत होणारे शोषण थांबविण्याकरीता अनेक कायदे तयार केले. त्यामुळे स्त्रियाचे शोषण आणि आर्थिक पिळवणूक करणाऱ्यावर कायद्याने बंदी घातली.

स्त्रियांना इस्टेट, वारसा हक्क अशा इतर अनेक सोयी डॉ.आंबेडकरांनी करुन दिल्या आहेत. भारतीय मानसिकता काही गोष्टी स्विकारण्यास आजही वेळ लावीत आहे. आपणास स्वतंत्र भारताच्या आधी आणि स्वतंत्र भारतानंतरही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांएवढा तळमळीचा, कळकळीचा, कार्य आणि कर्तव्यातून स्त्रियांसाठी लढणारा योध्दा दिसणार नाही. डॉ.आंबेडकर म्हणजे स्त्री मुक्तीचे समर्थ आणि विजयी योध्दे होते.

**संदर्भ :**

1) रत्नाकर गणवीर 'डॉ.आंबेडकर आणि हिंदू कोड बिल' नागपूर 1987, पृष्ठ क्र.47
2) चांगदेव भ.खैरमोडे, 'डॉ.आंबेडकर आणि हिंदू कोड बिल' पुणे व्दितीयावृत्ती 1987, पृष्ठ क्र.7
3) उनि, डॉ.आंबेडकर आणि हिंदू कोड बील, खंड 1 ला पृष्ठ-57
4) उनि, डॉ.आंबेडकर आणि हिंदू कोड बील खंड 1 ला पृष्ठ 70-71
5) शंकरराव खरात (संपा.) 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची आत्मकथा' पुणे मार्च 1987, पृ.69-71
6) उनि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड-6, पृ.70-71
7) शशिकांत दैठणकर, 'लोकराज्य' मुंबई एप्रिल 1981 पृ.23
8) शरणकुमार लिंबाळे, 'प्रज्ञासूर्य' कोल्हापूर जून 1991
9) सोहनलाल शास्त्री, 'बाबासाहेब डॉ.बी.आर.आंबेडकर के संपर्क में पच्चीस वर्ष'; दिल्ली व्दितीयावृत्ती 1975
10) D.R.Meghe, 'Hindu Law Committee Report', Vol.II Nagpur, 1981